# प्रेसनोट

दि. १७/१२/२०२३

## चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड येथील सहायक पोलीस उपनिरीक्षकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड गु.र.नं. ८११/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | नरेंद्र लक्ष्मण राजे, वय ५४ वर्ष, पद - सहायक पोलीस उपनिरीक्षक, चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १,००,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | १६/१२/२०२३ |
| सापळा दिनांक | १७/१२/२०२३ |

ठिकाण :- चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या गाडीचा अपघात झालेला असून, सदरबाबत चिखली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७९९/२०२३, भा.दं.वि.कलम २७९, ४२७, मो.व्हे. ॲक्ट कलम १८५, १८४, ११९/११७ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास लोकसेवक सहायक पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र राजे हे करीत होते. सदर अपघाताच्या गुन्ह्यातील तक्रारदार यांची गाडी त्याना परत करण्यासाठी लोकसेवक नरेंद्र राजे यांनी तक्रारदार यांचेकडे दीड लाख रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती १,००,०००/- रुपये (एक लाख) रुपये ठरले. त्यांपैकी लोकसेवक नरेंद्र राजे यानी तक्रारदार यांचेकडून दि. १३/१२/२०२३ रोजी १५,०००/- रुपये व दि. १५/१२/२०२३ रोजी ५५,०००/- रुपये स्विकारले असून, उर्वरित रक्कमेची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यानी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक नरेंद्र राजे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे अपघातातील वाहन परत करण्यासाठी उर्वरित रक्कमेपैकी २०,००००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष मागणी करुन, लोकसेवक नरेंद्र राजे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये २०,०००/- (विस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. लोकसेवक नरेंद्र राजे यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

[signature]

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.